## प्रेस नोट

### स्वयंसेवी संस्था सोबत मा. पोलीस आयुक्त सो, पुणे शहर यांची बैठक

मा. श्री. के.व्यंकटेशम, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १६/७/२०१९ रोजी मा.श्री. रविंद्र शिसवे सो, सह पोलीस आयुक्त सो, पुणे शहर, मा. श्री. अशोक मोराळे सो,अपर पोलीस आयुक्त सो, गुन्हे पुणे यांचे उपस्थितीत पोलीस आयुक्तालयातील कॉन्फरन्स हॉल येथे,सामाजिक काम करणारी व विधीसंघर्षित बालकांसाठी काम करणारी स्वयंसेवी संस्था "सोशल व्हेंचर पार्टनर" व "लाइफ स्कुल फाऊंडेशन" या संस्थेचे पदाधिकारी यांचेसमवेत बैठक पार पडली, सदर वेळी वरील दोन्ही संस्थेचे एकुण २९ पदाधिकारी उपस्थित होते.

नमुद वेळी मा. पोलीस आयुक्त सो, पुणे शहर यांनी पुणे शहर पोलीस दलातर्फे नागरिक, महिला, कामगार महिला, विदयार्थी/विदयार्थीनी यांचेसाठी सुरक्षेचे वेगवेगळे राबविणेत येणारे उपक्रमांची माहीती पॉवर प्रेझेंटेशनद्वारे उपस्थितांना दिली. त्यामध्ये पोलीस काका, बडी कॉप, भरोसा सेल, ज्येष्ठ नागरिक विभाग इत्यादी उपक्रमाचा ऊहापोह करणेत आला. उपस्थित स्वयंसेवी संस्थेचे पदाधिकारी यांनी त्यास उत्तम प्रतिसाद दिला व सदर उपक्रमाचे कौतुक केले. मा. पोलीस आयुक्त सो, यांनी सदरवेळी मा. शिरीष सरदेशपांडे सो, पोलीस उप-आयुक्त गुन्हे पुणे शहर यांनी उपस्थितांना दृकश्राव्याद्वारे माहीती दिली. सदर बैठकीचे नियोजन व आराखडा क्रांती पवार, पोलीस निरीक्षक प्रशासन गुन्हे व शिल्पा चव्हाण पोलीस निरीक्षक, विशेष बाल सुरक्षा पथक गुन्हे शाखा पुणे यांनी व त्यांचे पथकाने केले.

Chavhan
18/7

(शिल्पा चव्हाण)
पोलीस निरीक्षक
विशेष बाल सुरक्षा पथक
गुन्हे शाखा पुणे शहर